डॉ. शेख फैजमहंमद नुरमहंमद, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः स्वसेनि-२०१५/प्र.क्र.१०९९/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: १३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/डॉ. शेख/स्वेसेनि/टे.क्र.५/२ब/११८० /१७, दि.१३/१०/२०१७.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६०० - ३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेले डॉ. शेख फैजमहंमद नुरमहंमद, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, पारा, ता. वाशी, जि. उस्मानाबाद यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.१७.०७.१९८६ अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. डॉ. शेख, यांनी म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतुदीनुसार २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केलेली असल्याने, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (५) नुसार डॉ. शेख यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहित कालावधीत मागे न घेतल्याने, म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार डॉ. शेख हे आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाले आहेत. सबब, डॉ. शेख यांनी दि. १९/१०/२०१५ च्या अर्जान्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ (१) (२) (५) मधील

तरतुदींनुसार डॉ. शेख फैजमहंमद नुरमहंमद शेख, वैद्यकिय अधिकारी, गट-अ, हे दि.१९/०१/२०१६ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११३१५१३१०४९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2017.11.13 15:52:37 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ लातूर.
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद.
७) डॉ. शेख फैजमहंमद नुरमहंमद, वैद्यकिय अधिकारी यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ लातूर यांचे मार्फत)
८) निवडनस्ती सेवा-३.